# काय रे तुझ्या शिक्षणाचा उपयोग !

मी आहे शिक्षक. मी एका पर्समधून पैसे चोरले. सर्व लोक म्हणत होते, ऐवढा शिक्षक झाला, असे कसे पैसे चोरले ! तो शिक्षक म्हणाला, 'अहो' , पण माझ्या शिक्षणात कुठेही मनावर ताबा कसा ठेवायचा व पैसे चोरण्याच्या मोहापासून दूर कसं रहायचं याच प्रशिक्षण दिल नाही हो.' अर्थात शिक्षण कुचकामीच ठरलं तर !

मी आहे डॉक्टर. मी आत्महत्येचा प्रयत्न केला. सगळे म्हणाले, पहा कसा डॉक्टर आहे, आत्महत्या करत होता. हा डॉक्टर असामी म्हणाला, 'अहो माझ्या अभ्यासक्रमात कुठेही, आलेल्या समस्यांशी सामना कसा करायचा हे नव्हत शिकवलं.' प्रश्न तसाच उरतो. मग कशाला रे डॉक्टर झालास ? जर तुझं शिक्षण तुला येवढीही ताकद देऊ शकत नाही, तर अशा शिक्षणाचा उपयोग तो काय ?

मी आहे इंजिनिअर. पण कुठेही नोकरीत टिकत नाही. बेकार आहे. नोकरीत लागणारी चपळता, सगळ्यांशी मिळून मिसळून काम करणं, कामावर वेळेवर पोहोचणं, स्वतःच्या रागावर ताबा मिळवणं, या तत्सम गोष्टी मला माझ्या अभ्यासक्रमात कुणी शिकवल्याच नाहीत. पुन्हा प्रश्न पडतो, इतक्या शुल्लक गोष्टी जर तुझं शिक्षण देऊ शकलं नाही तर तुझ्या शिक्षणाचा उपयोग तो काय ?

मी आहे Chartered Accountant, जबर काळी माया जमवली. आज जेल मध्ये आहे. माझ्या शिक्षकांनी मला कधी सचोटीनी वागावं, जीवनात प्रामाणिकपणा हीच खरी संपत्ती आहे, हे शिकवलच नव्हतं. पुन्हा तोच प्रश्न, शिक्षणाने प्रामाणिकपणा जोपासला नाही, तर अशा शिक्षणाचा उपयोग तो काय ?

मी आहे वकील. सतत खोटेच बोललो. खोट्याला कायम खरच आहे हेच ठासून सांगत आलो आणि हेच संस्कार मी माझ्या मुलावर केले. आज सबंध कुटूंबच प्लॉट विक्रीच्या खोट्या डील मध्ये फसलं आहे. माझ्या शिक्षणाने माझ्यात सच्चेपणाचा संस्कारच दिला नाही. काय फायदा, या अशा

शिक्षणाचा ?

मी आहे Computer Operator. गंमत म्हणून दूसऱ्यांचे Accounts उघडण्याचं कसब शिकलो व हळूहळू Bank Accounts च्या अफरातफरीतच अडकलो. पुन्हा प्रश्न, मग कशाला रे घेतलं अस शिक्षण ?

या वेगवेगळ्या व्यवसायात जर नितीमूल्यच रुजत नसतील तर या शिक्षणाचा फायदाच नाही. तेव्हा सर्व अभ्यासक्रमात आमुलाग्र बदल करावा लागेल. अभ्यासक्रम शिक्षकांचा, डॉक्टरकीचा, वकिलीचा, Chartered Accountant किंवा कुठलाही असू दे. पण या सर्व अभ्याक्रमांना ध्यानाची जोड द्या. ध्यान करतांना, विपश्यना ध्यान पध्दतीत श्वासावर लक्ष ठेवायला सांगतात. दोन तीन श्वास पाहीले की लक्ष भरकटतं, पुन्हा श्वासावर लक्ष आणायचं. पुन्हा लक्ष भरकटेल, पुन्हा त्याला श्वासावर आणा. असं करता करता मनाच भरकटणं कमी होतं, मनावर ताबा मिळवता येतो. मनाचे आपण गुलाम न होता मन आपल गुलाम होतं. पण त्यासाठी शास्त्रशुध्द रीतीने ध्यानविधी शिकावी लागेल आणि खऱ्या अर्थाने शिक्षणाचं सार्थक होईल. तेव्हा कुणी असं म्हणणार नाही, काय रे तुझ्या शिक्षणाचा उपयोग ? कारण पुस्तकांमधून मिळते ती फक्त माहिती, पण मूल्य रुजवायची असतील तर मनाचं प्रशिक्षणच घ्यावं लागेल म्हणजे ध्यानच कराव लागेल. पुस्तकात, 'नुसतं, चोरी करु नये' हे वाक्य वाचून, मूल्य रुजणार नाही. ध्यानाने मन तीक्ष्ण होत जातं. खंर-खोट्यातला फरक अस तीक्ष्ण मन क्षणात ओळखेल व खोट्या मार्गाने जाणार नाही. ध्यानानं एकाग्रता वाढेल व व्यवसायात यश मिळवणे सोपे होईल. मग मन कशाला वाईट मार्गाने पैसा कमवेल ? ध्यानाने विकारांवर विजय मिळविल्यामुळे आपोआपच कामाचे कसब आत्मसात करणे सोपे होईल. अन् अशी व्यक्ती सर्वांना हवी हवीशी वाटेल. ही व्यक्ती नोकरी गमावण्याची शक्यता तर सोडाच, अशा व्यक्तीची नोकरी व्यावसायात पण भरभराटच होईल. करुन तर बघा ध्यान ! ध्यानाचा करिष्मा तुमच्या जीवनाला नवीनच रम्य दिशा देईल व अनमोल असा आनंदाचा ठेवा तुम्हाला गवसेल.